दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● सोमवार २९एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २५६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# मनोज जरांगेंच्या भेटीने बजरंग सोनवणे आनंदीत
# नारळी सप्ताहास उपस्थित राहून घेतले आशीर्वाद

**वादळवार्ता/बीड**
सिरस मार्ग येथे नारायणगडावर आयोजित नारळी सप्ताहास राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी उपस्थिती लावून आशीर्वाद घेतले. यावेळी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीने बजरंग सोनवणे आनंदीत झाले. सोनवणेंनी त्यांच्या तब्येतीची विचारपूस करीत आजचा दिवस भरून पावल्याच्या भावना व्यक्त केल्या. यावेळी ह.भ. प. विठ्ठल महाराजांचे आशीर्वाद घेऊन त्यांनी भविकांशी संवाद साधला.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी प्रचाराला गती दिली असून प्रत्येक तालुक्यात दौरे सुरू आहेत. त्यांनी रविवारी तांदळवाडी भिल्ल येथे गहिनीनाथ गडावर नारळी सप्ताह व सिरस मार्ग येथे नारायणगडावर नारळी सप्ताहास उपस्थिती लावली. यावेळी



महाराष्ट्राच्या व देशाच्या इतिहासात आंदोलनाचा धगधगता इतिहास देशासमोर ठेवणाऱ्या मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीने बजरंग सोनवणे हे आनंदीत झाले. सोनवणे यांनी मनोज जरांगे यांच्या तब्येतीची विचारपूस करीत हितगुज केले. त्यांच्या भेटीने आजचा दिवस भरून पावल्याच्या भावना बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केल्या.

या नारळी सप्ताहात ह. भ. प. शिवाजी महाराज व ह.भ.प. विठ्ठल महाराज यांचे आशीर्वाद घेत त्यांनी उपस्थित असलेल्या असंख्य भाविकांशी संवाद साधला. त्याचबरोबर महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार बदामराव पंडित यांच्यासह इंडिया आघाडीतील मित्रपक्षांचे पदाधिकारी व भाविक उपस्थित होते.

## महाश्रमणजी महाराजांचे घेतले शुभाशीर्वाद

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह पेंडगाव येथे जैन धर्मातील तेरापंथचे आचार्य युगप्रधान श्री महाश्रमणजी महाराज यांचे दर्शन घेऊन शुभाशीर्वाद घेतले.

## डॉ.आंबेडकर जयंती महोत्सवास भेटी देत अशोक हिंगे यांनी साधला मतदारांशी संवाद

**बीड (प्रतिनिधी )** बीड लोकसभेचे वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी काल केज तालुक्यातील विविध ठिकाणच्या आंबेडकर जयंती महोत्सवास भेटी देत मतदारांशी संवाद साधला यावेळी मतदारांनी हिंगे यांना मोठ्या मताधिक्याने विजय करून संसदेत पाठवण्याचा निर्धार व्यक्त केला

वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या नियोजनबद्ध प्रचाराने महायुती महाविकास आघाडी च्या उमेदवाराना धडकी भरली असून अशोक हिंगे पाटील यांना प्रत्येक गावातून जातीभेद विसरून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे महायुती, महाविकास आघाडीचे उमेदवार हे जातीपातीचे राजकारण करत आहेत हे सुज्ञ मतदारांनी ओळखले आणि पुरोगामी महाराष्ट्रात जातीच्या राजकारणला थारा नाही म्हणून महायुती महाविकास आघाडीच्या उमेदवाराला घरी बसऊन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना मोठ्या मताधिक्याने विजय करून संसदेत पाठवायचेच असा निर्धार प्रत्येक गाव खेड्यातील मतदार बोलून दाखवत आहे काल अशोक हिंगे पाटील यांनी आडस सोनवळा, मुलेगाव भावठाणा, केज, मसाजोग, गांजी आदी गावच्या आंबेडकर जयंती महोत्सव कार्यक्रमास भेटी दिल्या व मतदारांशी संवाद साधला यावेळी गावागावात हिंगे पाटील यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले .प्रत्येक गावातून सर्व जाती धर्मातील लोकांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणाऱ्या अशोक हिंगे पाटलांना संसदेत पाठवायचेच असा निर्धार मतदारांनी बोलून दाखविला यावेळी प्रत्येक ठिकाणी हजारो मतदारांची उपस्थिती दिसून आली.

## आरे वणीचा पाडा येथे स्नेहसंमेलन

**मुंबई प्रतिनिधी** गोरेगाव पूर्व आरे कॉलनी येथील वणीचा पाडा येथील मुलांसाठी नुकतेच श्री समर्थ विद्यालय जोगेश्वरी पूर्व आयोजित स्नेहमिलन कार्यक्रम पार पडला.मागील आठ दहा वर्षांपासून येथील साधारण दिडशे मुलांना शाळेच्या शिक्षकांच्या स्वखर्चाने बसने विद्यार्थ्यांना वांद्रेकर वाडी येथील श्री समर्थ शाळेत शिकण्यासाठी आणले जात आहे.



दहावी पास झाले तरी आजही या मुलांची नाळ शाळेशी जुळलेली आहे.यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ महादेव वळंजू आणि इतर पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.शाळेचा माजी विद्यार्थी अजित भोगले यांचे तर्फे मुलांना पेन सेट भेट देण्यात आला.

## श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन

माजलगाव- अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने प्रति वर्षी प्रमाणे याही वर्षी श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी निमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताह दि ३० एप्रिल ते ६ मे दरम्यान येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात आयोजित करण्यात आला असून या दरम्यान सामुहिक श्री गुरुचरित्र पारायण, गणेश याग, मनोबोध याग, श्री स्वामी याग, चंडी याग, श्री गिताई याग, श्री रूद्र, मल्हारी याग दररोज सकाळी नित्य स्वाहाकार, सायंकाळी विष्णु सहस्त्रनाम, भगवद्गीतेचा १५ वा अध्याय, संत तुकाराम महाराजांचे अभंग, पसायदान , मनाचे श्लोक, तसेच सकाळी ८ ते रात्री ८ महिला प्रहरे व रात्री ८ ते सकाळी ८ पुरुष प्रहरे व दि ०६ मे सोमवार रोजी सकाळी सत्यदत्त पूजन, बलिपुर्णाहुती व श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी निमित्त महाआरती अशा विविध उपक्रम व सेवा होणार असून या सेवेचा सर्व भाविक भक्त व श्री स्वामी समर्थ सेवेकरी यांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र (दिंडोरी प्रणित) शाहुनगर माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## १३ मे रोजी मतदान करायला घराबाहेर पडा
## जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे कळकळीचे आवाहन

बीड दि.28: सोमवार दिनांक 13 मे रोजी बीड लोकसभा मतदारसंघात मतदान असून मतदान करण्यासाठी मतदार नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे कळकळीचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी मतदान जनजागृतीसाठी आयोजित सायकल रॅलीच्या समापन कार्यक्रमात केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून मतदारांमध्ये मतदानाचा जागर करण्यासाठी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. खर्च निरीक्षक सुशांत कुमार बिस्वास हे या मतदार जागृत सायकल रॅलीच्या समापन कार्यक्रमात आवर्जून उपस्थित होते. आज बीड लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा बीड, केज, माजलगाव, आष्टी, परळी, गेवराई या विधानसभा मतदार संघांमध्ये ही सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या रॅलीला मतदार नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. त्यापुढे म्हणाल्या, बीड लोकसभा मतदार संघातील जिल्हा प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी तसेच जिल्हा परिषद, पोलीस विभागातील सर्वच अधिकारी, कर्मचारी असे जवळपास 15000 विविध शासकीय सेवेतील अधिकारी, कर्मचारी दिवस-रात्र निवडणुकीच्या विविध जबाबदारीचे वहन करीत आहेत. ही जबाबदारी मतदार नागरिकांनी मतदान करण्यासाठी पार पाडीत आहेत. मतदारांनी सोमवार दिनांक 13 मे रोजी घराबाहेर पडून मतदान करून मतदानाचा आपला हक्क बजवावा, असे कळकळीचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# सर्व सामान्य नागरिकांसह बळीराजाने शेतकरी पुत्र बजरंग सोनवणेंना निवडून द्यावे - रमेशतात्या गालफाडे

## बजरंग सोनवणेंच्या प्रचारार्थ रमेश गालफाडेंच्या पाटोदा तालुक्यात भेटीगाठी

**वादळवार्ता/केज**
राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व इंडिया आघाडीचे बीड लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार बजरंग मनोहर सोनवणे यांच्या प्रचारार्थ बहुजन विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष रमेशतात्या गालफाडे यांनी पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे ग्रामस्थांशी चाय पे चर्चा करत संवाद साधला. त्याचबरोबर घुमरा पारगाव येथे कॉर्नर बैठक घेऊन सर्व सामान्य नागरिकांसह बळीराजाने शेतकरी पुत्र बजरंग सोनवणेंना निवडून द्यावे. असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी रमेशतात्या गालफाडे म्हणाले की, राज्यातील राजकारणाची खालावलेल्या स्थितीमुळे सर्व सामन्यांचे प्रश्न मार्गी लागत नसून महागाईने जनता त्रस्त झाली असून शेतकरी विरोधी धोरणामुळे येथील बळीराजा देशोधडीला लागला आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेसह बळीराजाने शेतकरी पुत्र असलेल्या बजरंग बप्पा सोनवणे यांना प्रचंड मतांनी निवडून देण्यासाठी तुतारी समोरील बटन दाबावे असे आवाहन रमेशतात्या गालफाडे यांनी केले.

दरम्यान, ज्ञानराधा बँकेतील आपल्या कष्टाचा पैसा मिळत नसल्याने चिंताग्रस्त झालेले नामदेव गाडे यांचे दुःखद निधन झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांचे बहुजन विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष रमेशतात्या गालफाडे यांनी सांत्वनपर भेट देऊन गाडे कुटूंबियांचे सांत्वन केले. तसेच ज्ञानराधा बँकेततील पैसे नामदेव गाडे यांच्या परिवाराला कसे मिळतील यासाठी बहुजन विकास परिषद प्रयत्न करेल असा विश्वास रमेशतात्या गालफाडे गाडे कुटूंबियांना दिला. यावेळी बहुजन विकास परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



संपादकीय

## साहित्य नगरीत

माझा जन्म डोंगरातला,सुंदर खेड्यातला...त्याचे नाव पेमगिरी..जे पूर्वी प्रेमनगरी या नावाने प्रसिद्ध होते. पुर्वीचा शहागड व आता त्याला आपण सर्व पेमगिरीचा किल्ला म्हणून ओळखतो.वडिलांच्या नोकरीमुळे आम्ही तेथे गेलो ...वडील माध्यमिक शिक्षक.. श्री. दत्तात्रय कोंडाजी खेमनर सर.नोकरीला ते प्रथम याच गावात लागले..त्या काळातील बी.एस सी. बी.एड. त्यांचा विषय भौतिकशास्त्र अन् गणित.वडिल विज्ञान अन् गणिताचे शिक्षक म्हणून क्रमाने आमच्या भावंडांची नावे ही त्यांनी पेमगिरी या नावावरून प्रवीण,प्रेरणा,अन् मी प्रतिमा...छोटी बहिण आईच्या माहेरी झाली म्हणून तिचे नाव स्वाती ठेवले.आजी आजोबांना आमची नावे उच्चारता येत नव्हती म्हणून आम्हाला टोपण नावे ठेवली.. भावाला पिंटू,बहिणीला छाया..अन् मला माया..छोट्या बहिणीचे येत होते उच्चारता नाव त्यामुळे तिला स्वातीच बोलत होते सगळे.. स्वाती नक्षत्र.आई शिवण काम करायची अन् वडिलांची शिक्षक ही नोकरी.

वडिलांना शेती नव्हती..होती थोडी फार ती वडिलांच्या नातेवाईकांनी घेतली.त्यामुळे गावी जाण्याचा आमचा कधी फारसा योग येत नसे.आजी-आजोबा होते तो पर्यंत जात.पण मी लहान असताना च आजी आजोबा देवाघरी गेले.आता फक्त मामाचे घर..म्हणजे आईचे माहेर राहिले.उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाकडे जात. शेतातील मजा तेथे येत.पण इकडे पेमगिरीला नित्य संध्याकाळी शाळा सुटली रे सुटली आम्ही घरी जावून दप्तरे ठेवत...गणवेश बदलत अन् लगेच फ्रेश होवून डोंगरावर पळत पळत चढत.रानमेवा भरपूर खाल्ला तेथे..त्यात जास्त दिवाळीत मजा येत..खूप सीताफळे खात... झाडावर पिकलेली सीताफळे खायला खूप मजा येत.डोळा आलेली घरी घेवुन येत..व घराच्या माडीवर पिकायला घालत असत.डोंगरावर पेमा देवी चे व सिताई देवीचे मंदिर..खूप छान.वरती तर थंड पाण्याच्या टाक्या.. बाराही महिने टाक्यात पाणी असतं.खाली पायथ्याशी भवानी मातेचे मंदिर....जागरूक देवस्थान.तिन्ही देवतांना भेटायला खूप आवडतं.शिवाय वेगवेगळ्या रंगाची खडे गोळा करायची हौस,डोंगरावर आम्ही छोटे रस्ते केले होते .म्हणजे दोन्ही बाजूंनी दगडी ठेवून ठेवून आम्ही रस्ता बनवला..आमच्या आई वडिलांना समजावे आम्ही कोणत्या रस्त्याने नित्य जातो..फिरतो.कित्येक वेळेस ..दगडाखाली साप,विंचू,खेकडे भेटत..पावसाळ्यात बेडके असत..कधी कधी खूप घाबरत.सीताफळे तोडताना तर एकदा तर मधमाशांनी तर स्वाती( छोटी बहिण) व माझ्यावर ..मोठा हल्लाबोल केला होता. आम्हाला चालता च येत नव्हते.तेव्हा वडिलांचे विद्यार्थी जे हॉस्टेल मध्ये रहात त्यांनी आम्हाला झोळी करून खाली घरी आणले व दवाखान्यात नेले.पण,अजून ही आमची सीताफळे तोडायची हौस काही जात नाही ...आता ही आम्ही दिवाळीत खास डोंगरावर जातो..अन् तो आनंद आम्ही घेवून मुलांना ही देतो..खूप मज्जा येते..निसर्गाची देणगी आमच्या गावाला लाभली आहे..अप्रतिम.तेथे रांगोळीचे खडक ही आहेत त्यात दुसरे दगड टाकत असा आम्ही.शिवाय डोंगरावरील रानफुले आमचे खूप लक्ष वेधून घेत..जरी गंध नव्हता पण रूप,आकार मनमोहक होता.त्यांच्या संगतीत रमायला खूप आवडतं..त्यांच्या सोबत बागडत...फुलपाखरासंग नित्य धावत असत.

शनिवार अन् रविवार नित्य नेमाने मैत्रिणीच्या घरी असतं..तिच्या घरी शेती होती.पेरू,बोर,चिंच,कैऱ्या खाणे....शेतात जाणे,भटकणे ही काम करत..खूप हटके जीवन होते.त्यानंतर गावाच्या बाहेर धरण होते त्याच्या बाजूला आंबराई होती..तेथे सू पारंब्यांचा खेळ आमचा चाले.सुट्टीच्या दिवशी मैत्रिणीच्या घरी गेलो नाही तर धरणाच्या बाजूला पाणी साठत तेथे जात... अंघोळी करत.. मासे कसे पकडत ते पाहत..कपडे धुत बायका ..त्यांना भिजवत.आंबराईत ..वाळलेल्या साळी गोळा करत सरपण साठी..तसेच शेण गोळा करत.. घरी आल्यावर त्याच्या गोवऱ्या थापत .काही बागेत टाकत खतासाठी.डोंगरावरून ही वाळलेले गवत, शेण आणत.आमच्या वाड्यात आमची मोठी बाग होती. गावात कोणाच्याच घरी इतकी फुल व फळ झाडे नव्हती.सगळ्या प्रकाराची फुल व फळ झाडे आमच्या घरी होती ...पूजेला आमच्याच बागेतील फुले घेवून जात आजूबाजूची लोक. आमच्या बागेवर सर्वांचा डोळा होता.वाडा खूप जुना होता..खूप साप निघत ...पण आम्हाला त्यांनी कधी त्रास दिला नाही.पण विंचू मला २-३ वेळा चावला...तेव्हा ..मग प्रत्येकाला झोपायला पलंग बनवले.खालीच झोपत होते..त्यामुळे ते झोपेत येवून चावत..पण ते ही मलाच चावले.अन् नंतर एकदा तर भावाचे घड्याळ पलंगाखाली पडले होते ते शोधायला गेले ...अंधार असल्यामुळे काही दिसले नाही..घड्याळ समजून विंचवालाच पकडले... पण त्याने मग मला चांगलेच पकडले..खूप जोराचा चावा घेतला त्याने...पिवळा ,मोठा विंचू होता तो.

भावाला भुंगे पकडायला खूप आवडतं.आमचा एकही कंपास बॉक्स नीट राहत नसतं त्याला छिद्र पाडून

# चित्रपटसृष्टीचा व्यावसायिक भक्कम पाया!

[दादासाहेब फाळके जयंती विशेष.]

दादासाहेबांच्या जन्मशताब्दीपासून भारत सरकारने दादासाहेब फाळके पुरस्कार देण्यास सुरुवात केली. हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार आहे. याचे स्वरूप दहा लाख रुपये आणि सुवर्णकमळ असे आहे. भारतीय चित्रपटसृष्टीत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या कलावंत-तंत्रज्ञाला या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. भारतीय टपाल खात्यानेही दादासाहेबांच्या सन्मानार्थ त्यांचे छायाचित्र असलेल्या टपाल तिकिटाचे अनावरण केले. मुंबई येथील चित्रनगरी-फिल्मसिटी आता दादासाहेब फाळके चित्रनगरी या नावाने ओळखली जाते. दिग्दर्शक परेश मोकाशी यांनी हरिश्चंद्राची फॅक्टरी या चित्रपटातून दादासाहेबांचे कार्यकर्तृत्व प्रेक्षकांसमोर आणले. त्यांच्या हरहुन्नरीची कहाणी सांगते श्री एन. कृष्णकुमार यांची वाणी... संपादक.

दादासाहेब फाळके हे भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक आहेत. ते भारतीय चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, पटकथाकार आणि चित्रपट महर्षी म्हणूनही ओळखले जातात. त्यांचे पूर्णनाव धुंडिराज गोविंद फाळके असे होते, पण ते दादासाहेब या नावानेच अधिक प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म दि.३० एप्रिल १८७० रोजी महाराष्ट्राच्या नासिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे झाला. त्यांचे वडील गोविंदशास्त्री उर्फ दाजीशास्त्री व मातोश्री द्वारकाबाई होत. दाजीशास्त्री स्वत: संस्कृत भाषेचे विद्वान आणि त्र्यंबकेश्वर मंदिराचे पुजारी होते. त्यामुळे दादासाहेबांचे बालपण धार्मिक वातावरणात व्यतीत झाले. दादासाहेब १२ वर्षांचे असताना दाजीशास्त्रींनी मुंबईतील एलफिन्स्टन कॉलेज येथे संस्कृतचे प्राध्यापक म्हणून नोकरी स्वीकारली. त्यामुळे फाळके कुटुंब मुंबईला स्थलांतरितझाले. दादासाहेबांना लहानपणापासूनच वेगवेगळ्या कला शिकण्याची आवड होती. त्यामुळे मुंबईच्या मराठा हायस्कूलमध्ये शालेय शिक्षण पूर्ण झाले. त्यानंतर सन १८८५मध्ये त्यांनी जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्स येथून एक वर्षाचा चित्रकलेचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. मग बडोदा येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या कलाभवनातून त्यांनी तैल रंगचित्रण, जल रंगचित्रण, वास्तुकला आणि नमुना प्रतिरूपण- मॉडेलिंग यामध्ये प्रावीण्य मिळवले. याचबरोबर त्यांनी छायाचित्रण, प्रकाश शिलामुद्रण- फोटोलिथोग्राफी या व्यावसायिक कलांचेही शिक्षण घेतले. त्यात विविध प्रयोगही केले. अहमदाबाद येथील सन १८९२मधील औद्योगिक प्रदर्शनात त्यांच्या आदर्शगृहाच्या प्रतिकृतीला सुवर्णपदक मिळाले. त्यांनी गुजरातमधील गोध्रा येथे व्यावसायिक छायाचित्रकार म्हणून व्यवसाय सुरू केला. पण तेथे त्यांचा जम बसला नाही. ते सन१९०० साली बडोद्याला परतले. मात्र त्यांच्यातला हरहुन्नरी माणूस त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. त्यांनी एका जर्मन जादूगाराकडून जादूची कला शिकून प्रोफेसर केल्फा या नावाने जादूचे प्रयोग दाखवायला सुरुवात केली. हे प्रयोग त्यांनी एका लघुपटात चित्रितही केले.

दादासाहेबांचा पहिला विवाह सन १८८६मध्ये झाला. पण त्यांच्या पत्नीचे व मुलाचे गुजरातमध्ये प्लेगच्या साथीने सन १९०० साली देहावसान झाले. त्यानंतर दोन वर्षांनी त्यांचा विवाह सरस्वतीबाई-पूर्वाश्रमीच्या गिरिजा करंदीकर यांच्याशी झाला. सात मुले व दोन मुली असा त्यांचा परिवार बहरला. सरस्वतीबाईंनी चित्रपट निर्मितीच्या सर्वच क्षेत्रांत दादासाहेबांना मोलाची मदत करत आयुष्यभर साथ दिली. दादासाहेबांनी चित्रपट निर्मितीच्या तंत्राचा अथक परिश्रम करून अभ्यास केला. परिणामस्वरूप १९११-१२च्या काळात अंधत्वही आले होते. पण चिकाटीने त्यांनी त्यावर मात केली. तत्कालीन भारतीय समाजव्यवस्थेत चित्रपट निर्मिती करताना सामाजिक अडचणींसोबतच आर्थिक अडचणींनाही त्यांना सामोरे जावे लागले. चित्रपटात काम करण्यासाठी स्त्री कलावंतच काय, पुरुष कलावंतही तयार होत नसत. अशावेळी गरज पडल्यास ते स्वत: किंवा कुटुंबियांपैकी कोणीतरी ते उभे करीत. सुरुवातीच्या त्यांच्या चित्रपटातील स्त्री पात्रांच्या भूमिकाही त्यांनी पुरुषांकडूनच करून घेतल्या. त्यांना अनेक कला अवगत असल्यामुळे त्याचा उपयोग त्यांनी चित्रपटनिर्मिती करताना केला. त्यामुळे ते चित्रपट तांत्रिकदृष्ट्या उत्तम असत. त्याकाळी परदेशातही चित्रपट निर्मिती करण्याचा प्रस्ताव त्यांच्यासमोर ठेवण्यात आला. पण त्या मोहाला बळी न पडता त्यांनी भारतातच चित्रपट निर्मिती केली. आपल्या देदीप्यमान कारकीर्दीत त्यांनी एकूण ९५ चित्रपट आणि २६ लघुपटांची निर्मिती केली.

दादासाहेबांनी सन १९०३ साली भारतीय पुरातत्त्व खात्यात प्रारूपकार आणि छायाचित्रकार म्हणून नोकरी पत्करली. या फिरतीच्या नोकरीमुळे त्यांना भारतातील अनेक वास्तुशिल्पे पाहता आली. परंतु स्वातंत्र्यलढ्यात लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या वंगभंग चळवळीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. चळवळीला साथ देत त्यांनी ही सरकारी नोकरी सोडून दिली. त्यांनी लोणावळ्याला फाळके एनग्रेव्हिंग अँड प्रिंटिंग प्रेस- वर्क्स ही संस्था सुरू केली. पुढे ती दादरला हलविली. तिचे रूपांतर लक्ष्मी आर्ट प्रिंटिंग वर्क्समध्ये झाले. सन १९०९मध्ये ते जर्मनीहून तीनरंगी मुद्रणप्रक्रियेचे अद्ययावत तांत्रिक शिक्षण घेऊन भारतात परतले व ही संस्था त्यांनी भरभराटीस आणली. मात्र दहा वर्षांत व्यवसायातील भागीदारांबरोबर बेबनाव झाल्यामुळे ते वेगळे झाले. यामुळे दादासाहेब उद्विग्न होते. याच दरम्यान त्यांनी मुंबईमध्ये लाईफ ऑफ जिझस ख्राईस्ट- ख्रिस्ताचे जीवन हा मूक चित्रपट पाहिला आणि त्यांच्या आयुष्यातले ध्यासपर्व सुरू झाले. स्वदेशी चित्रपट बनवायचा या विचाराने त्यांना झपाटून टाकले. भारतीय इतिहासातील महान व्यक्तिमत्त्व असलेल्या श्रीकृष्णाच्या जीवनावरही असाच चित्रपट बनवायचा ध्यास घेऊन अथक प्रयत्नांनी त्यांनी लंडनला जाऊन चित्रपटविषयक तांत्रिक ज्ञान मिळवले. तेथे आवश्यक यंत्रसामग्री आणि कच्चा माल मागविण्यासाठी नोंदणीही केली. ते भारतात परतले. तेथील वास्तव्यात प्रसिद्ध चित्रपट निर्माते सेसिल हेपवर्थ यांच्याशी त्यांचा परिचय झाला. सर्व सामग्री मे महिन्यामध्ये हाताशी आल्यावर प्रयोगादाखल जून-जुलैमध्ये रोपट्याची वाढ हा एका मिनिटाचा लघुपट तयार करून काही निवडक व्यक्तींना दाखवला. त्याचा योग्य परिणाम वाटल्याने पत्नीचे दागदागिने गहाण ठेवून भांडवल उभे केले. लवकरच मुंबई- दादर येथे फाळके चित्रपट निर्मितिगृहाची स्थापना केली. सहा महिन्यात मुंबईच्या कोरोनेशन चित्रपटगृहामध्ये त्यांनी निर्मिलेला राजा हरिश्चंद्र हा पहिला भारतीय बनावटीचा मराठी पूर्ण बोलपट सन १९१३ साली प्रदर्शित झाला. राजा हरिश्चंद्रच्या यशाने खऱ्या अर्थाने भारतीय चित्रपटसृष्टीचा एक व्यवसाय म्हणून पाया रचला गेला. या चित्रपटाकरिता लेखक, छायालेखक, रंग वेशभूषाकार, कलादिग्दर्शक, संकलनकार, रसायनकार आदी सर्व भूमिका दादासाहेबांनी पार पाडल्या. या चित्रपटांनंतर त्यांनी मोहिनी भस्मासूर व सत्यवान सावित्री या चित्रपटांची निर्मिती केली. यांनाही चांगले व्यावसायिक यश लाभले. त्यांनी सन १९१४मध्ये पुन्हा इंग्लंडला प्रयाण केले. या वास्तव्यात त्यांनी निर्मिती केलेले चित्रपटही तेथील निर्मात्यांना दाखवले. या चित्रपटांतील तांत्रिक अंगांचे परदेशातही खूप कौतुक झाले.

भारतीय चित्रपट व्यवसायास २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मुंबईतील महोत्सवात कृतज्ञतेचे प्रतिक म्हणून फाळके यांना पाच हजार रुपयांची थैली अर्पण करण्यात आली. आर्थिक विवंचनेतच वयाच्या ७४व्या वर्षी दि.१६ फेब्रुवारी १९४४ रोजी त्यांचे नासिक येथे निधन झाले. !! जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन !!

**श्री एन. कृष्णकुमार,**
**से. नि. अध्यापक.**
**(मराठी लेखक व कवी)**
**मु. रामनगर, गडचिरोली.**
**जि. गडचिरोली,**
**मोबा. ७७७५०४१०८६.**

# जिल्ह्यातील परिवर्तनाची सुरुवात याच लोकसभा निवडणुकीतून होणार - बबन गित्ते



**वादळवार्ता/परळी वैज्यनाथ**

बीड जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. तरुणांच्या हाताला काम नाही, दरडोई उत्पन्नात प्रचंड प्रमाणात घट झालेली असून, त्याच्या तुलनेत महागाई दुप्पट वाढली आहे. यामुळे सर्वसामान्य माणूस आर्थिक संकटात सापडला आहे. जिल्ह्यातील सत्ताधारी नेत्यांनी जिल्ह्याचा अजिबात विकास केला नाही. जिथेतिथे भ्रष्टाचार बोकाळला असून, हे सर्व थांबवायचे असेल आणि जिल्ह्याला विकासाच्या मार्गावर आणायचे असेल तर जिल्ह्यात परिवर्तन घडून येणे महत्त्वाचे आहे. याची सुरुवात याच लोकसभा निवडणुकीतून होईल असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष बबन भाऊ गित्ते यांनी केले.

महाविकास आघाडीचे लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ त्यांनी परळी शहरातील विविध भागांतील मतदारांशी घरोघरी जाऊन संवाद साधला. यावेळी त्यांच्या समवेत ज्येष्ठ नेते फुलचंद कराड यांच्यासह महाविकास आघाडीतील सर्व पक्षांच्या प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष बबन भाऊ गित्ते यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांचा परळी शहरात जोरदार प्रचार सुरू आहे. शहराच्या विविध भागांत जाऊन ते मतदारांच्या व्यक्तिशः भेटीगाठी घेत आहेत. नागरिकांतून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, बजरंग बप्पांना सर्वाधिक मताधिक्य परळी शहरातून मिळणार आहे. रविवारी परळी शहरातील गानेशपार, नांदूर वेस, बंगला गल्ली, देशमुख गल्ली, सरकार वाडा, गोपनपाळे गल्ली, अंबेवेस आदी भागांत प्रचार फेरी काढण्यात आली. या प्रचार फेरीत शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे नेते नारायण सातपुते, शहर प्रमुख राजेश विभुते, तालुका प्रमुख भोजराज पालीवाल, तालुका उपप्रमुख महेश केंद्रे, सचिव प्रकाश साळुंके, संघटक सतीश जगताप, समन्वयक भरत इंगळे, जगन्नाथ साळुंके, आपचे शहर प्रमुख व त्यांचे सर्व कार्यकर्ते, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज, शहर अध्यक्ष जीवनराव देशमुख, युवक अध्यक्ष शंकर शेजुळ, काँग्रेस शहर अध्यक्ष बहादुर भाई, आंतरराष्ट्रीय मानवाधिकारचे अध्यक्ष जमील अध्यक्ष, जिल्हा सरचिटणीस प्रकाश मुंडे, कार्य अध्यक्ष शशीशेखर चौधरी, उपाध्यक्ष सुभाष देशमुख, अँड.प्रकाश मुंडे, अँड.सतीश देशमुख, भगवान कदम, इतेशाम खतीब, युवक विधानसभा अध्यक्ष रणजित देशमुख, अलीम भाई, फिरोज सैय्यद, मेहबूब कुरेशी, रमेश चौंडे, जेष्ठ नेते गुलाबराव देवकर, अनुसुचित जाती-जमाती अध्यक्ष दीपक शिरसाट, ओबीसी अध्यक्ष जावेद भाई, अल्पसंख्याक शहर अध्यक्ष रसूल खान, तालुका अध्यक्ष सद्दाम भाई, बद्दर भाई, अल्ताफ भाई, सियम, लखन सुरवसे, नवनीत संघई, संतोष साखरे, विशाल गावडे, मनोज गित्ते, रेखा लक्ष्मण जानराव, महिला आघाडी अध्यक्ष दिपाली सावंत यांच्यासह शेकडो कार्यकर्ते पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# स्नेहल सामंत यांना कर्तव्यदक्ष समाजसेविका पुरस्कार

**वादळवार्ता/मुंबई**



महाराष्ट्र विद्या विकास मंडळ संचालित पंत वालावलकर विद्यालय कुर्ला पूर्व येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापिका स्नेहल सामंत यांना नुकताच जॉय संस्थेच्या वतीने आदर्श समाजसेविका पुरस्कार संस्थापक गणेश हिरवे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.मुख्याध्यापक असताना अनेक विद्यार्थी सामंत मॅडमनी घडविले की आज ते विविध ठिकाणी मोठ मोठ्या ह्युदांवर काम करतात तसे त्यांच्या मुख्याध्यापक पदाच्या कारकीर्दीत शाळेने विविध स्पर्धेत अनेक पारितोषिके प्राप्त केली. सध्या महाराष्ट्र मंडळाच्या कोषाध्यक्ष म्हणून त्या कार्यरत आहेत.आजही शाळेची त्यांची नाळ पूर्वीप्रमाणेच जोडलेली आहे.शाळा, विद्यार्थी, शिक्षक यांचेसाठी काय चांगले करता येईल यासाठी त्या सातत्याने पुढाकार घेत असतात. पुरस्कार मिळाल्याने शाळेतील शिक्षक, विद्यार्थी सर्वांनीच त्यांचे अभिनंदन केले आहे.

# मोटरमन चंद्रशेखर सावंत यांचे सेवा निवृत्तीला पुस्तके भेट देण्याचं स्तुत्य आवाहन

**वादळवार्ता/मुंबई**

दिवस ३ जुलै २०१८, स्थळ अंधेरी रेल्वे स्थानक. मुसळधार पावसामुळे सर्वत्र दैना उडालेली असताना सकाळी साडेसातच्या सुमारास या स्थानकात काहीतरी भलेमोठे कोसळल्याचा जोरदार आवाज आला आणि त्यासोबतच ट्रेन चे अर्जेंट ब्रेक अचानकपणे दाबल्याचा देखील. अंधेरी पूर्व पश्चिम जोडणारा गोखले पादचारी पूल थेट रेल्वे रुळांवर कोसळला होता. याच रुळावर येणाऱ्या लोकलचा आपत्कालीन ब्रेक दाबत लोकलचे मोटरमन सावंत यांनी शेकडो प्रवाशांचे प्राण वाचवले होते. लोकल तशीच पुढे गेली असती तर थेट ब्रीज लोकलवर कोसळून मोठी जीवितहानी झाली असती. पश्चिम रेल्वेत मोटरमन म्हणून गेली कित्येक वर्षे नोकरी करणाऱ्या सावंत यांनी दाखवलेल्या ह्या प्रसंगावधनाने अनेकांचे जीव त्या दिवशी वाचले. येत्या ३१ मे २०२४ रोजी श्री चंद्रशेखर सावंत पश्चिम रेल्वेतील सेवेची ३२ वर्षे पूर्ण करून सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या असामान्य कामगिरीसाठी त्यांना अनेक शासकीय व स्वयंसेवी संस्थांनी गौरवले आहे. पश्चिम रेल्वेने त्यांचा आदर्श मोटरमन म्हणून गौरव करत रु ५ लक्ष पारितोषिक दिले होते. त्यातील ३ लाख रुपये त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांसाठी खर्च केले. येत्या ३१ मे रोजी त्यांची सेवानिवृत्ती मोठया दिमाखात पार पडणार असली तरी त्यांनी सामाजिक भान जपत आपल्या सेवनिवृत्तीला भेटायला येणाऱ्या सर्वांनी आपल्याला पुस्तक भेट देण्याचे आवाहन केले आहे. या दिवशी जमा होणारी पुस्तके ते एखाद्या शाळेत किंवा ग्रंथालयात भेट देणार आहेत.

# ब्लू बेल्स शाळेचा अविर पाटील राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत भारतात पहिला




**वादळवार्ता/नायगाव**

आज हैदराबाद येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय अबॅकस प्रतियोगितेमध्ये अविर पाटील यांने भारतात पहिला क्रमांक पटकावला.

ब्लू बेल्स शाळेत शैक्षणिक वर्षे २०२३-२४ इयत्ता पाचवी ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांना अबॅकस घेण्यात आले होते. अबॅकसमुळे विदयार्थी कमी वेळात जास्तीत जास्त गणित सोडवितो. गणिताबद्दल ओढ निर्माण होते. यात त्यांनी आपले कौशल्य दाखविले. शाळा स्तरावर अबॅकसचा सराव घेऊन काही निवडक विद्यार्थ्यांची जिल्हास्तरासाठी निवड करण्यात आली होती. नांदेड येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी पहिला, दुसरा क्रमांक पटकावला होता. यातूनच राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेसाठी १) आर्जुन राठोड २) शौर्य कवटीकवार ३) अवीर पाटील ४) विश्वजित गायकवाड ५) शिवम विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. ती राज्य स्तरीय स्पर्धा हैदराबाद येथे घेण्यात आली होती. त्या स्पर्धेतही शाळेच्या विद्यार्थ्यांनी पहिला, दुसरा क्रमांक पटकावला व राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेसाठी पात्र ठरले होते, त्यात १) अविर पाटील २) शौर्य कवटीकवार आणि ३)आर्जुन राठोड या तीन विद्यार्थ्यांची निवड झाली होती.

आज हैद्राबाद येथे झालेल्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत अविर पाटील यांनी भारतातून पहिला क्रमांक पटकावला व त्याची निवड आंतरराष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेसाठी झाली आहे. यावेळी सौ.सुनंदा मामीडवार, सिद्धार्थ गायकवाड, स्वप्निल सब्बनवार, नागेश घंटे, तानाजी सर या शिक्षकांनी केले आहे.

हा पहिला आल्याबद्दल त्यांचे संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.के. हरीबाबू, सल्लागार डॉ. साई दीप्ती कोप्पोलू, डॉ. गड्डमवार, डॉ गायकवाड, गोविंद पवार, पर्यवेक्षक दत्ता कंदुर्के, विलास कानगुले, गंगाधर कानगुले, राजू गडगेकर, लक्ष्मण पिटलेवाड, इरबा शेळके,सौ.वर्षा मॅडम सौ.संगिता मॅडम व सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.

# कीटक नियंत्रणासाठी अल्प खर्चिक सापळे ,,,,शिक्षक आनंदराव चरापले यांचा प्रयोग.

**वादळवार्ता/कुडूत्री**

शेतीमध्ये पाले भाज्या ,फळ भाज्या आणि फळशेती मध्ये हानिकारक कीटक नियंत्रणासाठी शेतकरीवर्ग रासायनिक औषधांची फवारणी मोठ्या प्रमाणात करत आहेत. याचा परिणाम मानवी आरोग्यावर होऊ लागला आहे. फळभाज्या पिकात कीटक बंदोबस्तासाठी रासायनिक औषधांचा मारा करण्यापेक्षा कीटक बंदोबस्तासाठी कीटक नियंत्रक सापळे फायदेशीर असतात.कीटक नियंत्रक सापळे अगदी अल्प किमतीत शेतकऱ्यांना घरच्या घरी निर्मित करता येईल अशा सापळ्यांची निर्मिती माध्यमिक शिक्षक आनंदराव चरापले यांनी केली आहे.

शेतकरी फळ शेतीमध्ये हानिकारक कीटकांचा बंदोबस्त औषधे किंवा महागड्या किमतीचे सापळे वापरतात. पण सर्वच शेतकऱ्यांना महाग सापळे विकत घेणे शक्य नाही.याचा विचार करून हानिकारक कीटकांचा बंदोबस्त करण्यासाठी बाळासाहेब पाटील हायस्कूल कौलव (ता राधानगरी) येथील विज्ञान शिक्षक आनंदराव चरापले यांनी अल्प खर्चिक सापळे कीटक नियंत्रणासाठी तयार केले आहेत.




आनंदराव वसंत चरापले यांनी आपले विज्ञान अध्यापनाचे कार्य करत असताना विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवले आहे.विज्ञान उपकरणांचा लाभ ग्रामीण शेतकरी वर्गाला व्हावा यासाठी किटकभक्षी सापळे निर्माण केले आहेत.हानिकारक कीटक बंदोबस्त साठी स्टीकी ट्रॅप ,लाईट ट्रॅप ,लुअर ट्रॅप आशा तीन प्रकारचे सापळे अगदी अल्प खर्चिक निर्मित केले आहेत. सदरचे सापळे पर्यावरण पोषक असून हानिकारक कीटक बंदोबस्तासाठी उपयुक्त ठरत आहेत.लाईट ट्रॅप सुलभ तयार केला आहे.एक तगड घेऊन सेल वापरून बल्ब प्रकाशित केले असून यासाठी फक्त पन्नास रुपये खर्च आला आहे.शिवाय कोणताही धोका नाही.लुअर ट्रॅप रिकाम्या बरणी पासून अवघ्या वीस रुपयात तयार केला आहे.तर स्टीकी ट्रॅप पाच रुपयात तयार केला आहे.फळ बागेत ,भाजीपाला पिकात तसेच फळ बागेत असे ट्रॅपचे आपल्या शेतीच्या प्लॉटनुसार संच वाढवता येतात.शेतकऱ्यांना घरच्या घरी हे ट्रॅप तयार करता येतात.पीक फुलोऱ्यास आल्यापासून काढणीपर्यंत या ट्रॅपची निगराणी ठेवल्यास हानिकारक कीटकांचा सुलभरीत्या बंदोबस्त करता येतो.अल्पखर्चीक सापळे कीटक बंदोबस्तासाठी फायदेशीर ठरत आहेत. कीटक नियंत्रण सापळे निर्मितीसाठी कोल्हापूर आर्य समाज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष इंद्रजित पाटील ,सचिव अनिरुद्ध पाटील -कौलवकर यांनी प्रोत्साहन दिले.आनंदराव चरापले यांनी शेतकरी उपयुक्त साधने निर्माण केल्याबद्धल त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

> शेतीमध्ये पर्यावरण पोषक तंत्रे विकसित होणे गरजेचे आहे.आनंदराव चरापले यांनी तयार केलेले अल्पखर्चीक कीटक नियंत्रक सापळे फळ भाज्या शेती बरोबर नदीकाठच्या हुमणी कीड कीटक नियंत्रणासाठी उपयुक्त आहेत.
> ,,,बाळासाहेब खडके ,शेतकरी कौलव.

> शेतकऱ्यांनी घरच्या घरी अल्प किमतीत साधने निर्मित करणे गरजेचे आहे.सेंद्रिय शेती व रेग्युलर शेती अल्पखर्चीक कीटक सापळे फायदेशीर आहेत.
> ,,,आनंदराव चरापले,विज्ञान शिक्षक.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी विजय दादा पोकळे यांची निवड

**(बीड / प्रतिनिधी)**

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष माननीय नामदार श्री सुनीलजी तटकरे साहेब बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे साहेब राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अँड प्रज्ञा खोसरे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी रोजगार व स्वयंरोजगार सेलच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी विजय दादा पोकळे यांची निवड करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री माननीय अजित दादा पवार प्रदेशाध्यक्ष माननीय सुनीलजी तटकरे साहेब यांच्या विचारानुसार रोजगार व स्वयंरोजगार सेलच्या माध्यमातून पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्य पर्यंत पोहोचण्यासाठी तसेच पक्ष संघटना बळकट करण्यासाठी आपले सहकार्य राहील असा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी रोजगार व रोजगार सेल महाराष्ट्र अध्यक्ष सौ मेघा हनुमंत पवार यांनी विश्वास टाकला आहे तसेच विजय दादा पोकळे यांची निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी ग्रंथालय विभागाचे बीड जिल्हाअध्यक्ष बालासाहेब फपाळ पाटील बीड तालुका अध्यक्ष अनिता आदापुरे महिला आघाडीच्या शहराध्यक्ष पूनम मॅडम गेवराई तालुका अध्यक्ष भीमराव जाधव बीड जिल्हा सल्लागार रूपाली गायकवाड पाटोदा तालुका अध्यक्ष बंडू घालमिले छाया गायकवाड नीलम आहीवळे बीड शहराध्यक्ष नसरीन बागवान महिला आघाडीच्या सचिव अनुराधा प्रकाश वैशाली कांबळे रेखा खंडागळे. स्नेहा खंडागळे . तसलीम बेलदार आनिता ढोरमारे शालिनी परदेशी प्रीत कुकडजा गेवराई तालुका अध्यक्ष रोहिणी बाबर सह अनेक पदाधिकारी यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या



# प्रा.बालाजी मन्नाडे यांना डॉक्टरेट जाहीर

**वादळ वार्ता**

प्रा.बालाजी मन्नाडे यांची भारत सरकारच्या सलग्नित असलेल्या मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड अंतर्गत मॅजिक अँड आर्ट युनिव्हर्सिटी हरियाणाकडून डॉक्टरेटची निवड करण्यात आली. त्यांना डॉक्टरेट जाहीर करण्यात आली. येत्या काही दिवसातच त्यांना डॉक्टरेट प्रदान करण्यात येणार आहे. प्रा. बालाजी मन्नाडे यांचे साहित्यिक आणि शैक्षणिक कार्यात उल्लेखनीय योगदान असून ते कवी,गीतकार,साहित्यिक,समीक्षक,वक्ते व निवेदक



आहेत.त्यांना आतापर्यंत २१ पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले.आहे त्यांचे सहा पुस्तके प्रकाशित असून दोन पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. बालाजी मन्नाडे यांना डॉक्टरेट जाहीर झाल्याने त्यांच्यावर हित चिंतकाकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांचे विद्यार्थी,पालक, शिक्षक,शिक्षकेत्र कर्मचारी,गावकरी ,कुटुंबीय,मित्र परिवार,गुरुजन वर्ग, सर्वच स्तरावरून त्यांचे कौतुक होत आहे.

# सगर सेवार्थी विशेषांक २०२४ चे पिंपळनेर येथे उत्साहात प्रकाशन

**दैनिक वादळ वार्ता**

सगर वंशीय जिरेमाळी समाजातील सेवार्थ बांधवांची अनमोल कलाकृती श्री स्वामी समर्थ कलाविष्कार गावगाडा प्रस्तुत श्री स्वप्नील नंदन सौ. रागीणी साळवे निर्मित पिंपळनेर रत्न ॲड बापूसो. संभाजीराव पगारे, किर्तनरत्न ह. भ. प. श्री रामचंद्र महाराज मार्गदर्शित, कवी लेखक गावगाडाकार तात्यासो. श्री साहेबराव नंदन श्री ललितभाऊ साळवे, प्रा. श्री डी. टी. पाटील संपादित सगर सेवार्थी विशेषांक २०२४ चे मोठ्या थाटात अनेक समाज बांधवांच्या उपस्थितीत पिंपळनेर येथिल स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालयात उत्साहात प्रकाशन पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. संभाजीराव पगारे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून किर्तनरत्न ह. भ. प. श्री रामचंद्र महाराज नंदन तसेच आक्कासो सौ. पुष्पलता पगारे, ज्ञानसिंधु प्रकाशनाचे संचालक साहित्यिक श्री तान्हाजीराव खोडे, श्री व्ही. एन. जीरे पाटील, सौ. शोभाताई जीरेपाटील, विजयराव सोनवणे, श्री स्वप्नीलआबा पगारे, सौ. छायाताई पगारे, श्री ए. टी. पाटील, संपादक श्री साहेबराव नंदन , कार्यकारी संपादक प्रा. डी. टी. पाटील, श्री ललीतभाऊ साळवे उपस्थित होते.

# पुरस्कार हे ध्येय असावे, तो मार्ग असू नये; डॉ. राजा दीक्षित यांचा लेखकांना सल्ला

**दैनिक वादळ वार्ता**

पुणे : पुरस्कार हे सामाजिक शाबासकीची थाप असते. त्यामुळे लेखकांचे पुरस्कार हे ध्येय असले, तरी तो मार्ग असू नये. लेखकांचा मार्ग हा कर्ममार्गच असावा. या मार्गावरच चालतच त्यांनी बालसाहित्याचे दालन अधिक समृद्ध करावे. अशी अपेक्षा विश्वकोष निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित यांनी व्यक्त केली. अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या वतीने डॉ. श्रुती पानसे यांच्या हस्ते बालसाहित्यकारांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्या वेळी अध्यक्षस्थानावरून डॉ. दीक्षित बोलत होते. या वेळी संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू, कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी उपस्थित होते. कार्यक्रमात स्वाती कान्हेगावकर (नांदेड), फारूक काझी (सांगोला, जि. सोलापूर), प्रमोद नारायणे (वर्धा), नसीम जमादार (कोल्हापूर), डॉ. प्रियदर्शनी देशमुख (अमरावती), विद्याधर शुक्ल (पुणे), संतोष धोंगडे (बेंगळुरू) यांच्यासह छत्रपती संभाजी नगर येथील ईश्वर पोकळे आणि त्रिशा पाटील या विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. डॉ. दीक्षित म्हणाले, वाङ्:मयात बालसाहित्याला विशेष स्थान आहे. त्यामुळे बाल साहित्याला आणखी खुप मोठी वाटचाल करायची आहे.

# कवी भारत कवितके यांच्या माझ्या गावाच्या दिशेने.. काव्यसंग्रहाची पुरस्कार साठी निवड.

**वादळ वार्ता | बीड**

भारत कवितके मुंबई कांदिवली कवी चंद्रकांत मोतीराम जोगदंड आयोजित चैत्र पालवी काव्य महोत्सव निमित्त भव्य खुले कवी संमेलन व साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कवी लेखक व इतर मान्यवर व्यक्ती ना पुरस्कार जाहीर करण्यात आले त्या वेळी मुंबई कांदिवली येथील जेष्ठ पत्रकार साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके यांना त्यांच्या " माझ्या गावाच्या दिशेने.." या काव्यसंग्रहास महात्मा बसवेश्वर स्मृती काव्य गौरव पुरस्कार साठी निवड झाल्याचे कवी चंद्रकांत मोतीराम जोगदंड यांनी भारत कवितके यांना निवड पत्रा व्दारे कळविले आहे. रविवार दिनांक ५ में २०२४ रोजी एस.एम.जोशी फाऊंडेशन पत्रकार भवन शेजारी गांजवे चौक,नवी पेठ, पुणे या ठिकाणी दुपारी २ ते ६ कवी संमेलन व सायंकाळी ६ ते रात्री ८ पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.या प्रसंगी मुंबई कांदिवली येथील पत्रकार साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके यांना त्यांच्या माझ्या गावाच्या दिशेने काव्यसंग्रहाला महात्मा बसवेश्वर स्मृती काव्य गौरव पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात येणार आहे.भारत कवितके यांच्या या काव्यसंग्रहाला एकूण या पूर्वी तीन पुरस्कार मिळाले असून हा चौथा पुरस्कार आहे.

# मतदान जागृतीसाठी सायक्लोथॉनचे आयोजन

वादळवार्ता/परवेज पटेल

बीड लोकसभा मतदार संघात रविवारी सायक्लोथॉन काढण्यात आली. मतदार संघाच्या जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्यासह बीड शहरातील नागरिकांनी मतदान जागृती कार्यक्रमात मोठ्या सहभाग नोंदवला. बीड लोकसभा मतदार संघात येणाऱ्या बीड २३० केज २३२, माजलगाव २२९, आष्टी २३१, परळी २३३ गेवराई २२८ या सहा विधानसभा मतदारसंघातही मतदान जागृतीसाठी सायक्लोथॉन आयोजित केले होते. या सायक्लोथॉन ची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून सकाळी सात वाजता सुरुवात झाली. सामाजिक न्याय भवन पासूनसुरुवात होऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून अन्ना भाऊसाठे चौक ते सुभाष रोड ते हिरालाल चौक ते बलभीम चौक ते बशीर गंज ते सिव्हिल हॉस्पिटल ते माने कॉप्लेक्स ते नाट्यगृह ते नगर नका ते भगवान बाबा चौक ते जिजामाता चौक ते डॉक्टर लाईन मार्गे शेवटी सामाजिक न्याय भवन येथे या मतदार जागृती सायक्लोथॉनचे समापन झाले. या सायकल रॅलीमध्ये जिल्हा प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी तसेच महसूल, पोलीस, जिल्हा परिषद सायकल संघटनेचे सदस्य यासह लायन्स क्लब, रोटरी क्लब, महिला सायकल संघटनेचे सदस्यासह जास्तीत जास्त मतदार नागरिकांनी सहभागी झाले होते. सोमवार दिनांक १३ मे रोजी बीड लोकसभा मतदारसंघात मतदान असून मतदान करण्यासाठी मतदार नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे कळकळीचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी मतदान जनजागृतीसाठी आयोजित सायकल रॅलीच्या समापन कार्यक्रमात केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून मतदारांमध्ये मतदानाचा जागर करण्यासाठी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. खर्च निरीक्षक सुशांत कुमार बिस्वास हे या मतदार जागृत सायकल रॅलीच्या समापन कार्यक्रमात आवर्जून उपस्थित होते. आज बीड लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा बीड, केज, माजलगाव, आष्टी, गेवराई या विधानसभा मतदार संघांमध्ये ही सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या रॅलीला मतदार नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. त्यापुढे म्हणाल्या, बीड लोकसभा मतदार संघातील जिल्हा प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी तसेच जिल्हा परिषद, पोलीस विभागातील सर्वच अधिकारी, कर्मचारी असे जवळपास १५००० विविध शासकीय सेवेतील अधिकारी, कर्मचारी दिवस-रात्र निवडणुकीच्या विविध जबाबदारीचे वहन करीत आहेत. ही जबाबदारी मतदार नागरिकांनी मतदान करण्यासाठी पार पाडीत आहेत. मतदारांनी सोमवार दिनांक 13 मे रोजी घराबाहेर पडून मतदान करून मतदानाचा आपला हक्क बजवावा, असे कळकळीचे आवाहन त्यांनी यावेळी केले भारतीय राज्यव्यवस्था न्यायपालिका, विधायिका, कार्यपालिका या तीन महत्त्वपूर्ण स्तंभांवर उभी असून कार्यपालिका म्हणून जिल्हा प्रशासन निवडणुकीचे काम चोख पार पाडत आहे. तर संसदेत पाठवण्याची जबाबदारी मतदारांची आहे मतदारांनी लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होऊन योग्य उमेदवार निवडून संसदेत पाठवावा आणि लोकशाही बळकट करावी, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. मागील दोन टप्प्यात मतदानाचा टक्का घसरल्याने बीडकरांनी मतदानात सक्रिय सहभागी होऊन बीडची जनता लोकशाही प्रिय आहे हे सिद्ध करून दाखवावे, असेही ते यावेळी म्हणाल्या. सायकल रॅली ला पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी हिरवा झेंडा दाखवून सायकल रॅलीचा शुभारंभ केला. सायकल रॅलीमध्ये जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्यासह निवासी स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, कार्यकारी अधिकारी नीता अंधारे, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त रवींद्र शिंदे, गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, स्विपचे नोडल अधिकारी, डॉ. विक्रम सारूक, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, नायब तहसीलदार सुहास हजारे, यासह रोटरी क्लब, लायन्स क्लब, योगा क्लब, डॉक्टर सायकल संघटनेचे सदस्यांमध्ये महिलांची संख्या ही अधिक होती. कॉलेज, शाळेकरी विद्यार्थी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक न्याय भवन पासून सुरुवात होऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून अन्ना भाऊसाठे चौक ते सुभाष रोड ते हिरालाल चौक ते बलभीम चौक ते बशीर गंज ते सिव्हिल हॉस्पिटल ते माने कॉप्लेक्स ते नाट्यगृह ते नगर नका ते भगवान बाबा चौक ते जिजामाता



चौक ते डॉक्टर लाईन मार्गे शेवटी सामाजिक न्याय भवन असा सायकल रॅलीचा मार्ग होता. निवासी उपजिल्हा अधिकारी यांनी दिली मतदान जागृती ची शपथ मतदान जागृती साठी आयोजित सायकल रॅली समापन कार्यक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी 'आम्ही भारतीय नागरिक लोकशाहीवर आमचा विश्वास...'आमिषाला बळी न पडता मतदान करू मतदान करू अशी प्रतिज्ञा घेत आहोत. अशी मतदान जागरुकतेची शपथ उपस्थितांना दिली. 'मी मतदान करणार' प्रतिज्ञा प्रमाणपत्र लिंक चे उद्घाटन मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहिल्याच दिवशी दोन तासात दैनिक मर्यादा पुर्ण मतदार जागरुकता सायकल रॅलीच्या समापन कार्यक्रमात जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनातून 'https://forms.gle/rCWv3M3Q1q8a-kfjn8' हवी लिंक मतदार जागृतीच्या संदर्भात स्वीप विभागाने तयार केली आहे. या लिंकवर क्लिक करून जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी मतदान जागृतीच्या उपक्रमाला आज सुरुवात केली. बीड लोकसभा मतदारसंघात दिनांक १३ मे रोजी मतदान होणार 'मी मतदान करणार' अशा आशयाची प्रतिज्ञा प्रमाणपत्राच्या स्वरूपात लिंक वर क्लिक केल्यावर प्राप्त केली जाऊ शकते. आज जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या हस्ते या लिंकचे उद्घाटन झाल्यावर अवघ्या दोन तासात लिंक ची दैनिक मर्यादा पुर्ण झाली. दिवसभरात १५०० मतदार मतदान करणार' असे प्रमाणपत्र प्राप्त करू शकतात. या लिंक वर क्लिक करून आपण जागरूक मतदार होऊ या, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी यावेळी केले. 'मी मतदान करणार' ही प्रतिज्ञा प्रमाणपत्र घेतल्यावर ते स्टेटसवर, व्हॉट्सॲप डीपी तसेच अन्य समाज माध्यमांवर ठेवून आपल्या सहकाऱ्यांना नातेवाईकांना मतदान करण्यासाठी उत्स्फूर्त करा, असेही ते यावेळी म्हणाल्या.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )